# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.11.2025** **वारःमंगळवार**

---

1. देशाचे 53वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी घेतली शपथ
2. मुख्य प्रवाहात परतण्यासाठी 15 फेब्रुवारी 2025पर्यंत सशस्त्र कारवाई थांबवण्याचं नक्षलवाद्यांचं सरकारला आवाहन
3. ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र काळाच्या पडद्याआड आणि
4. भारतीय महिला कबड्डी संघाची सलग दुसऱ्यांदा विश्वचषकावर मोहोर

**न्यायमूर्ती**

देशाचे 53वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी काल शपथ घेतली. नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिरला, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी तसंच केंद्रीय मंत्रिमंडळाचे सदस्य यावेळी उपस्थित होते. न्यायमूर्ती सूर्य कांत संवैधानिक, आणि दिवाणी कायदे क्षेत्रातले तज्ज्ञ आहेत. सरन्यायाधीशपदाचा त्यांचा कार्यकाळ 15 महिन्यांचा असेल.

**अयोध्या**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज अयोध्येतील श्रीराम मंदिराला भेट देणार आहेत. मंदिराचं बांधकाम पूर्ण झाल्याचं प्रतीक म्हणून राम मंदिराच्या कळसावर त्यांच्या हस्ते औपचारिक ध्वजारोहण होईल.

**नक्षलीपत्र**

सशस्त्र संघर्ष सोडून मुख्य प्रवाहात येण्याची आपली इच्छा असून 15 फेब्रुवारी 2026 पर्यंत सुरक्षा दलांची कारवाई स्थगित करावी अशी मागणी करणारं पत्रक नक्षली संघटनेच्या एमएमसी झोन अर्थात महाराष्ट्र-मध्यप्रदेश-छत्तीसगड प्रदेश समितीने तिन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या नावे जारी केलं आहे. अनंत या नावाने नक्षली प्रवक्त्याने हे पत्रक जारी केलं आहे. सशस्त्र संघर्षाला विराम देण्याची आपली इच्छा असून आपसात संवाद साधण्यासाठी फेब्रुवारी पर्यंतची वेळ हवा असल्याचं या पत्रकात म्हटलं आहे.

**माहे-युद्धनौका**

माहे ही युद्धनौका काल मुंबईत नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. यात 80 टक्क्यापेक्षा जास्त सामग्री स्वदेशी बनावटीची आहे. मलबार किनारपट्टीवरच्या माहे या ऐतिहासिक गावावरून हिचं नाव ठेवण्यात आलं आहे. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्या हस्ते ही नौका नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. देशाच्या सागरी सीमांच्या रक्षणासाठी समर्पित ही युद्धनौका पश्चिम किनाऱ्यावर तैनात असणार आहे.

**मुख्यमंत्री**

मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विविध पायाभूत प्रकल्पांची कामं  आगामी पाच वर्षात पूर्ण करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. मुंबईच्या पूर्व-पश्चिम आणि उत्तर-दक्षिण भागाला जोडणारे अनेक महत्त्वाचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार आहेत अशी माहिती त्यांनी दिली. मुंबईत इंडियाज् इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाईट नेशन्स म्हणजे आय. आय. एम. यू. एन. आयोजित 'यूथ कनेक्ट' कार्यक्रमात फडणवीस बोलत होते. तरुणाईच्या

माध्यमातून समाजात आणि राजकारणात परिवर्तन शक्य आहे असं सांगत, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपचे 40 टक्के उमेदवार हे तरुण असतील, असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**कामगार संहिता**

गेल्या आठवड्यात देशभरात लागू झालेल्या नवीन कामगार संहितांचं सर्व थरातून स्वागत होत आहे. या संहितांमुळे महिलांना कामाच्या ठिकाणी अधिक सुविधा प्राप्त होणार आहेत. याबाबत अधिक माहिती देताना ज्येष्ठ विधीज्ञ ॲडव्होकेट उदय वारुंजीकर म्हणाले.....

**वेज कोड बिल म्हणतय की महिलांना पुरुषाच्या बरोबरीनं देखील आता वेतन मिळणार आहे फ्लोर वेजेस या नावाची एक संकल्पना आणलेली आहे की ज्याच्यामुळं जर तुमच्या भागामध्ये जर काही विशेष मागासलेला भाग आहे तर त्या ठिकाणी असणारा मिनिमम वेजेस हे थोडेसे वेगळे असतात. शकतात जो प्रगत भाग आहे तर त्या ठिकाणचे वेजेस जास्त असू शकतात या प्रकारची देखील त्याच्यामध्ये कल्पना करण्यात आलेली आहे आणि सगळ्यात मोठे महत्त्वाची तरतूद म्हणजे की जे किमान वेतन ठरवण्याची जी प्रक्रिया आहे ती प्रक्रिया अत्यंत सुलभ या वेजेस कोड च्या माध्यमातून तयार करण्यात आलेली आहे**

नवीन कामगार संहितांच्या अनुषंगानं अडवोकेट उदय वारुंजीकर यांची मुलाखत विशेष वार्ता या कार्यक्रमात उद्या सकाळी दहा वाजता आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून प्रसारित केली जाणार आहे.

**इफ्फी**

गोव्यात सुरू असलेल्या 56व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात कृत्रिम बुद्धिमत्तेवरील म्हणजे एआय हॅकेथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे. या महोत्सवात मुलांचे प्रश्न, आव्हानं आणि संधी यावरील पाच चित्रपट काल दाखवण्यात आले. भारत, कोसोवो, इजिप्त, दक्षिण कोरिया अशा विविध देशांमधील हे चित्रपट होते. घर हा कोंकणी भाषेतला लघुपटही काल दाखवण्यात आला.

**सवाई गंधर्व**

पुण्यात येत्या 10 ते 14 डिसेंबर या कालावधीत रंगणाऱ्या सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवातील कलाकारांच्या नावांची घोषणा काल करण्यात आली. आर्य संगीत प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांनी याबाबत माहिती केली. यावर्षीच्या महोत्सवात पंडित उल्हास कशाळकर, विदुषी पद्मा देशपांडे, विदुषी डॉक्टर अश्विनी भिडे देशपांडे, कला रामनाथ आणि डॉक्टर जयंती कुमरेश तसंच पंडित व्यंकटेश कुमार हे जेष्ठ दिग्गज कलाकार आपली कला सादर करणार आहेत. डॉक्टर भरत बलवल्ली, सावनी शेंडे यांच्यासारखे आघाडीचे गायक आणि नव्या दमाच्या अनेक कलाकारांचंही सादरीकरण यंदा होणार आहे.

**धर्मेंद्र निधन**

भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, धर्मेंद्र यांचं काल मुंबईत राहत्या घरी निधन झालं. ते 89 वर्षांचे होते. काही दिवसांपूर्वीच रुग्णालयातील उपचारांतर ते घरी परतले होते. त्यांच्या पार्थिव देहावर काल दुपारी मुंबईत अंत्यसंस्कार करण्यात आले. कुटुंबिय, नातेवाईक आणि निकटवर्तीयांच्या उपस्थितीत या दिग्गज अभिनेत्याला अंतिम निरोप देण्यात आला. त्यांच्या करकीर्दीचा हा एक आढावा....

**धर्मेंद्र यांनी आपल्या सकस आणि दमदार अभिनयानं प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं. रोमॅंटिक नायक आणि ही मॅन अशा दोन्ही भूमिका त्यांनी लीलया साकारल्या. तीनशेहून अधिक चित्रपट... सहा दशकांचा प्रदीर्घ प्रवास... आणि सहज सुंदर  अभिनय, यामुळे धर्मेंद्र यांचं नाव भारतीय चित्रपटसृष्टीत सुवर्णाक्षरांनी कोरलं गेलं आहे. धर्मेंद्र यांचा जन्म 8 डिसेंबर 1935 रोजी पंजाबमधील नसराळी येथे झाला. अभिनयाच्या ओढीमुळे ते मुंबईत आले आणि 1960 मध्ये दिल भी तेरा हम भी तेरे या चित्रपटातून त्यांनी बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं.**

**यानंतर शोले, सीता और गीता, यादों की बारात, धर्मवीर, चुपके चुपके यांसारख्या अनेक सुपरहिट चित्रपटांबरोबरच त्यांची कारकीर्द बहरत गेली आणि त्यांनी चाहत्यांच्या मनात भक्कम स्थान निर्माण केलं. हेमा मालिनी यांच्याबरोबर त्यांची जोडी पडद्यावर आणि खऱ्या आयुष्यातही यशस्वी ठरली.**

**अत्यंत देखणं आणि रुबाबदार व्यक्तिमत्व आणि सहज सुंदर अभिनया यामुळे, ॲक्शन, रोमँस आणि कॉमेडी या तिन्ही शैलीतील चित्रपटांमध्ये ते अतिशय सहजरित्या आणि समर्थपणे वावरले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातली प्रामाणिकता आणि अतिशय साधेपणा यामुळे सर्वसामान्यांना ते आपले वाटू लागले. अभिनयाबरोबरच त्यांनी खासदार म्हणूनही समाजसेवेत मोठं योगदान दिलं. धर्मेंद्र यांच्या निधनानंतर संपूर्ण चित्रपटसृष्टीत आणि देशभरातील चाहत्यांमध्ये शोककळा पसरली आहे. अनेक नामवंत कलाकार, दिग्दर्शक आणि राजकीय व्यक्तींनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. धर्मेंद्र यांच्या जाण्यानं हिंदी सिनेमातील एक अजरामर युग संपल्याची भावना व्यक्त होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री, राज्याचे मुख्यमंत्री आणि सिनेजगतातील मान्यवरांनी या दिग्गज कलाकाराला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. भारतीय चित्रपटसृष्टीत आपल्या चमकदार अभिनयाची अमिट छाप सोडणारे धर्मेंद्र यांना...आकाशवाणीची विनम्र मानवंदना.**

**टीईटी-कोल्हापूर**

टीईटी अर्थात शिक्षक पात्रता परीक्षेच्या पेपर फुटी प्रकरणी कोल्हापूर पोलिसांनी गेल्या दोन दिवसात 18 जणांना अटक केली आहे. या सर्व आरोपींना आजपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात गुवाहाटी इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या कालच्या तिसऱ्या दिवसअखेर भारताचा संपूर्ण संघ 201 धावांवर बाद झाला, त्यामुळे दक्षिण आफ्रिकेचा संघ 314 धावांनी आघाडीवर आहे. काल दिवस अखेर दक्षिण आफ्रिकेच्या 8 षटकांत 26 धावा झाल्या आहेत.

**डेफ-ऑलिंपिक**

जपानमध्ये टोकिओ इथं सुरू असलेल्या, डेफ-ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत भारताच्या प्रांजली धुमाळनं महिलांच्या 25 मीटर पिस्टल नेमबाजीत सुवर्ण पदक पटकावलं. या स्पर्धेतलं तिचं हे तिसरं पदक आहे. याआधी तिनं एक सुवर्ण आणि एक रौप्य पदक पटकावलं आहे.

**कबड्डी**

भारताच्या महिला कबड्डी संघानं सलग दुसऱ्यांदा कबड्डी विश्वचषकाला गवसणी घातली आहे. ढाका इथं काल झालेल्या सामन्यात त्यांनी चायनीज तैपेईच्या संघावर 35-28 अशी मात केली. या स्पर्धेतल्या सर्व सामन्यात भारतीय संघ अजिंक्य राहिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कामगिरीबद्दल भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे.

**हवामान**

राज्यात बहुतांश भागात थंडीचा जोर काहीसा ओसरला आहे, येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.